प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
Department of Communication, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

**06 ऑगस्ट 2026**

# भारतीय रिझर्व बँकेने केदारनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, लातूर, महाराष्ट्र वर आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिझर्व बँकेने (आरबीआय) दिनांक 03 ऑगस्ट 2026, रोजीच्या आदेशाद्वारे, केदारनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., लातूर, महाराष्ट्र (बँक) वर 'आपला ग्राहक जाणून घ्या (KYC)' संदर्भात जारी केलेल्या काही निर्देशांचे आणि 'पर्यवेक्षकीय कृती चौकट (SAF)' या अंतर्गत जारी केलेल्या कार्यान्वयन सूचनांचे पालन न केल्याबद्दल ₹40,000/- (केवळ चाळीस हजार रुपये) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 च्या कलम 46(4)(i) आणि कलम 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(c) अन्वये आरबीआयला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

31 मार्च 2025 रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेची वैधानिक तपासणी आरबीआयद्वारे केली गेली होती. या तपासणी अहवालातील आरबीआयच्या दिशानिर्देशांचे पालन न केल्याचे पर्यवेक्षी निष्कर्ष आणि त्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती, ज्यामध्ये, सदर तरतुदींचे आणि निर्देशांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्याबद्दल दंड का लावू नये याची कारणे दाखवा, अशी विचारणा करण्यात आली होती. नोटीसला बँकेने दिलेले उत्तर, त्यानंतर सादर केलेले अतिरिक्त निवेदन आणि वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता आरबीआय, इतर गोष्टींबरोबर या निष्कर्षावर पोहोचली की आरबीआयच्या खालील निर्देशाचे पालन न केल्याचे आरोप सिद्ध होतात आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

बँक:

i. ग्राहकांचे केवायसी रेकॉर्ड निर्धारित वेळेत सेंट्रल केवायसी रेकॉर्ड रजिस्ट्रीमध्ये (CKYCR) अपलोड करण्यात अयशस्वी झाली; आणि

ii. पर्यवेक्षकीय कृती चौकट (SAF) अंतर्गत दिलेल्या निर्देशांचे पालन न करता, काही विशिष्ट ठेवींवर भारतीय स्टेट बँकेने देऊ केलेल्या दरांपेक्षा जास्त व्याजदर देऊ केले.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यात बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या किंवा करारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. तसेच, बँकेविरुद्ध आरबीआयने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईबद्दल पूर्वग्रह न ठेवता हा आर्थिक दंड लावला आहे.

**(ब्रिज राज)**
मुख्य महाप्रबंधक

**प्रेस प्रकाशनी: 2026–2027/826**